अपर जिल्हाधिकारी संवर्गातील
अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने पदस्थापनेबाबत
**श्री. तेजुसिंग वसराम पवार**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्र. बदली-२०२४/प्र.क्र. २९/ई-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २८ फेब्रुवारी, २०२४

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.
२) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९ /कार्या.१२, दि. १४.०७.२०२१.
३) महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र. संकीर्ण-२०२४/प्रक्र ०३/ई-१, दि.१५.०२.२०२४

**शासन आदेश:-**

संदर्भ क्र. ३ अन्वये, श्री. तेजुसिंग वसराम पवार यांची अपर जिल्हाधिकारी, धुळे या पदावर पदस्थापना करण्यात आली होती. सदर आदेशामध्ये अंशत: सुधारणा करुन पुढीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढूण टाकणे) नियम, १९८१ च्या नियम-४० मधील परिशिष्ट-२ मधील विहित अटी व शर्तीना अधीन राहून **श्री. तेजुसिंग वसराम पवार, अपर जिल्हाधिकारी** यांची **"अपर जिल्हाधिकारी, मुंबई विमानतळ विकास कंपनी, मुंबई"** या पदावर **३ वर्षांच्या कालावधीसाठी** सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

३. सदर आदेश तात्काळ अंमलात येत असून **श्री. तेजुसिंग वसराम पवार, अपर जिल्हाधिकारी** यांनी पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे.

४. **अपर जिल्हाधिकारी, मुंबई विमानतळ विकास कंपनी, मुंबई** या कार्यालयातील प्रतिनियुक्तीच्या अनुषंगाने **श्री. तेजुसिंग वसराम पवार, अपर जिल्हाधिकारी** यांच्या सेवा **अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, विमान संचालनालय, मंत्रालय, मुंबई** यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

५. **श्री. तेजुसिंग वसराम पवार, अपर जिल्हाधिकारी** यांनी पुढील सूचनांसाठी **अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, विमान संचालनालय, मंत्रालय, मुंबई** यांचेकडे तात्काळ हजर व्हावे.

६. प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आलेल्या श्री. तेजुसिंग पवार, अपर जिल्हाधिकारी यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. १७.१२.२०१६ व दिनांक १६.०२.२०१८ मधील अटी व शर्ती लागु राहतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०२२८१८०६१७८८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH
VITHOBA GAWDE

Digitally signed by SANTOSH VITHOBA GAWDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=8e111cd4ca87dbe700ee92d0e1b3fd993c8b0952a368e400ed2af72cb5dd990c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CA6A91A5EFCF2DDE6274B385D86F23914275B4E2B1125F6E74E6A1FAC7106C22, cn=SANTOSH VITHOBA GAWDE
Date: 2024.02.29 10:50:59 +05'30'

**( संतोष वि. गावडे )**
**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (विमान चालन) विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. विभागीय आयुक्त, कोकण विभाग

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३. मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमान विकास कंपनी, मुंबई-४०००३२.
७. प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
८. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
९. संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
१०.संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
११.संबंधित अपर जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त, कोकण यांचेमार्फत).
१२.उप सचिव (ई-१) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१३.निवडनस्ती (ई-१).